धान्यापासून मद्यार्क तयार करण्यासाठी व अशा मद्यार्काचा वापर करुन देशी व भारतीय बनावटीचे विदेशी मद्य तयार करण्यासाठी अनुज्ञप्ती देणे. स्पष्टीकरण....

**महाराष्ट्र शासन**
गृह विभाग
परिपत्रक क्र.एनएमए-०९०७/प्र.क्र.२४/राउशु-२
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २८ डिसेंबर, २००७.

वाचावे : १) शासन निर्णय, गृह विभाग क्र.बीपीए १०९७/१७/इएक्सरी-३, दि.८.३.२०००.
२) शासन निर्णय, गृह विभाग क्र.एनएमए ०२०६/प्र.क्र.३/राउशु-२, दि.८.६.२००७.
३) आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.डीवायएस ११२००५/चार, दि.२७.९.२००७.

**परिपत्रक :** मळी व्यतिरिक्त इतर पदार्थापासून मद्यार्क तयार करण्यासाठी व अशा मद्यार्काचा वापर करुन देशी व भारतीय बनावटीचे विदेशी मद्य तयार करण्यासाठी अनुज्ञप्ती देण्याचे धोरण संदर्भाधिन दि.८.३.२००० च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आले आहे. तसेच संदर्भाधिन दि.८.६.२००७ च्या शासन निर्णयान्वये धान्यापासून मद्यार्क तयार करण्यासाठी व अशा मद्यार्काचा वापर करुन देशी व भारतीय बनावटीचे विदेशी मद्य तयार करण्यासाठी अनुज्ञप्ती मंजूर करण्यासाठी "धान्याधारित आसवनी व एकात्मिक घटक अर्थसहाय्य" ही योजना शासनाने जाहिर केली आहे.

शासनाने घोषित केलेल्या उक्त नमूद "धान्याधारित आसवनी व एकात्मिक घटक अर्थसहाय्य" या योजनेची अंमलबजावणी करतांना काही अडचणी येत असल्याबाबत आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांनी संदर्भाधिन दि.२७.९.२००७ च्या पत्रान्वये या विभागास कळविले आहे. मळी पासून मद्यार्क निर्मिती करणारे काही घटक अशा अनुज्ञप्तींच्या ठिकाणीच शासनाने घोषित केलेल्या योजनेचा लाभ घेण्यासाठी मळी व्यतिरिक्त पदार्थापासून आसवनी व मद्य निर्मिती प्रकल्प उभारण्यासाठी शासनाकडे परवानगी मागतात. शासनाने घोषित केलेल्या या योजनेची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी तसेच या योजनेचा कोणताही गैरवापर टाळण्याच्या दृष्टीकोनातून सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित आसवनी प्रकल्प व मद्य प्रकल्प हे मळी आधारित आसवनी व मद्य निर्मिती प्रकल्पापासून वैयक्तिक व स्वतंत्र असणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर योजनेच्या अंमलबजावणीमध्ये संदिग्धता राहू नये म्हणून याव्दारे खालीलप्रमाणे स्पष्टीकरण

करण्यात येत आहे :-

उपरोक्त संदर्भाधिन क्र.१ येथील दि.८.३.२००० आणि दि.८.६.२००७ च्या शासन निर्णयान्वये फक्त मळी व्यतिरिक्त इतर पदार्थापासून मद्यार्क निर्मिती करीत असलेले घटकच मद्य निर्मिती अनुज्ञप्ती मंजूर करण्यास पात्र असतील आणि अशा आसवनी व मद्य निर्मिती प्रकल्पाची स्वतंत्ररित्या उभारणी करणे आवश्यक आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या मळी आधारित आसवनी व मद्य निर्मिती अनुज्ञप्तीमध्येच काही फेरफार करुन या योजनेचा लाभ घेता येणार नाही. तसेच मळी आणि इतर पदार्थापासून मद्यार्क निर्मिती करीत असलेले घटक देशी -विदेशी मद्य निर्मिती अनुज्ञप्ती मंजूर करण्यास व या योजनेचा लाभ घेण्यास पात्र रहाणार नाहीत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

( गौ. जो. रसाळ )
उप सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग.

प्रति,

१) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५) विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, नविन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई.
६) आयुक्त (कृषी), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७) सर्व जिल्हाधिकारी.
८) सर्व विभागीय उपायुक्त, राज्य उत्पादन शुल्क.
९) सर्व अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क.
१०) राउशु-३ व राउशु-४ कार्यासन, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) निवड नस्ती, राउशु-२ कार्यासन, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.

*****